जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -५२६ दिनांक - १२/१२/२०२४**

युनिट ६ गुन्हे शाखा,पुणे शहर

## कोलवडी -साष्टे परिसरात अवैध दारूभट्टी केली उध्वस्त

दि.११/१२/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट ६ कडील पोलीस उप-निरीक्षक रामकृष्ण दळवी व पथक असे हद्दीत गुन्हे अवैध धंदे प्रतिबंधक गस्त करत असताना माहिती मिळाली की, कोलवडी- साष्टे येथील रिकामेवस्ती परिसरात नदीचे कडेला एक इसम दारूची भट्टी लावुन दारू तयार करत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

सदर ठिकाणी जावुन छापा टाकला असता इसम नामे **ज्ञानेश्वर गब्बर रजपूत, वय २१, रा. वाडेगाव, ता.हवेली, जि.पुणे हा साष्टे गाव**, रिकामेवस्ती येथे भट्टी लावुन दारू काढत असताना मिळुन आला असुन त्याचे ताब्यात ७० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू, ८००० लिटर कच्चे रसायण व इतर साहित्य असा २,९२,०००/- किमतीचा माल मिळुन आला तसेच अशाच प्रकारे हातभट्टीची दारू एक महिला हि देखील तयार करत असल्याची माहिती मिळाल्याने त्या ठिकाणी अचानक छापा टाकला असता सदर ठिकाणी ५० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू, ४००० लिटर कच्चे रसायण व इतर साहित्य असा एकुण १,५०,०००/- रू. कि.चा माल मिळुन आला दोन्ही कारवायांमध्ये एकुण ४,४२,०००/- रू.कि.चा माल मिळुन आला.

सदरबाबत लोणीकंद पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.११७१/२०२४, महाराष्ट्र प्रोव्हिबिशन कायदा कलम ६५ (फ) (ब) (क) (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगीरी मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री शैलेश बलकवडे, मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री निखिल पिंगळे, मा. सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री राजेंद्र मुळीक गुन्हे शाखा, युनिट -६ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट -६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे, पोलीस उप-निरीक्षक रामकृष्ण दळवी, पोलीस अंमलदार बाळासाहेब सकटे, रमेश मेमाणे, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, सुहास तांबेकर, ऋषीकेश ताकवणे, सचिन पवार, ऋषीकेश व्यवहारे, गणेश डोंगरे, शेखर काटे, नितीन धाडगे, बाळासाहेब तनपुरे, प्रतिक्षा पानसरे, किर्ती मांदळे यांनी केली आहे



